श्री.जयदिप डाकरे सर श्री.प्रविण डाकरे सर

माझा अभ्यास

Study From Home

गुरुमाऊली
एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe

इयत्ता – पाचवी (2 जुलै) माझा अभ्यास

Subscribe

शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट

दिवस दुसरा :

ब्रीज कोर्ससोबत चालू इयत्तेचा नियमित अभ्यासक्रम समाविष्ट. (वापरणे सक्तीचे नाही)

खालील कविता समजून घ्या व तालासुरात म्हणा.

टेस्ट सोडवा

१. सराव माय मराठी!

• ऐका व म्हणा.

माय मराठी! तुझिया पायी तनमनधन मी वाहियले,
तुझिया नामी, तुझिया धामी अखंड रंगुनि राहियले.

कष्टामधली तुझीच गोडी चाखायाची मज आई,
मला आवडे तुझा विसावा, तुझीच निर्भर अंगाई.

तुझे झरे अन् तुझी पाखरे, वास तुझा जनलोक तुझा,
हवाहवासा मला वाटतो राग तुझा, संतोष तुझा.

माय मराठी! तुझिया अंकी लोळण घेते, बागडते,
तसेच अलगत तव आभाळी भरारणे मज आवडते.

तुझे चालणे, तुझे बोलणे, दाखव मजला रीत तुझी,
जे ओठी ते पोटी असली शिकवी मजला प्रीत तुझी.

तुझियासाठी गुंफित बसते मोहनमाला शब्दांची,
अर्थ साजरा, गंध लाजरा, नवलपरी पण रंगांची.

माय मराठी! तुझियासाठी वात होउनी जळते मी,
क्षणाक्षणाने कणाकणाने तुझ्या स्वरूपा मिळते मी.

– संजीवनी मराठे

1. रोमन संख्याचिन्हे

रोमन संख्याचिन्हे समजून घ्या.

उदाहरणसंग्रह 1

टेस्ट सोडवा

1. 1 ते 20 या संख्या रोमन संख्याचिन्हे वापरून लिहा.

2. पुढील संख्या आंतरराष्ट्रीय संख्याचिन्हांत लिहा.

(1) V (2) VII (3) X (4) XIII (5) XIV (6) XVI (7) XVIII (8) IX

3. रिकाम्या चौकटी भरा.

संख्या	तीन		सहा		पंधरा	
रोमन संख्याचिन्ह		VIII		XII		XIX

4. रोमन संख्याचिन्हांचा उपयोग करून संख्या लिहा.

(1) 9 ☐ (2) 2 ☐ (3) 17 ☐

(4) 4 ☐ (5) 11 ☐ (6) 18 ☐

5. पुढे आंतरराष्ट्रीय अंकातील प्रत्येक संख्या रोमन संख्याचिन्हात लिहिलेली आहे. रोमन संख्याचिन्ह वापरून लिहिलेली संख्या बरोबर असल्यास त्याखाली '✓' अशी खूण करा. चूक असल्यास '×' अशी खूण करा आणि ती दुरुस्त करून लिहा.

आंतरराष्ट्रीय अंकांत लेखन	4	6	8	16	15
रोमन संख्याचिन्हांत लेखन	IIII	VI	IIX	XVI	VVV
बरोबर/चूक (चूक असल्यास दुरुस्ती)					

अधिक माहितीसाठी : L, C, D, M ही आणखी काही रोमन संख्याचिन्हे आहेत.

रोमन संख्याचिन्हे	I	V	X	L	C	D	M
संख्या	1	5	10	50	100	500	1000

उपक्रम : घड्याळाप्रमाणेच रोमन संख्याचिन्हांचा वापर आणखी कोठे कोठे केलेला दिसतो, याची नोंद करा.

दशमान संख्यालेखन पद्धती

रोमन पद्धतीने संख्या लिहिणे व वाचणे सोपे नसते. या पद्धतीत संख्या लिहून बेरीज-वजाबाकी करणेही बरेच अवघड असते. आपण 0 ते 9 हे दहा अंक वापरून संख्या लिहितो. यात स्थानांनुसार अंकांची किंमत ठरवतो. संख्या लिहिण्याच्या या पद्धतीला 'दशमान संख्यालेखन पद्धती' म्हणतात.

पुरातनकाली भारतीय गणितींनी संख्यालेखनासाठी दशमान पद्धतीचा वापर प्रथम सुरू केला. नंतर जगभर हीच पद्धत सोपी व सोईची म्हणून स्वीकारली गेली.

Understand Roman numerals.

Problem Set 1

1. Write all the numbers from 1 to 20 using Roman numerals.
2. Write the following numbers using international numerals.
   (1) V (2) VII (3) X (4) XIII (5) XIV (6) XVI (7) XVIII (8) IX
3. Fill in the empty boxes.

Number	Three		Six		Fifteen	
Roman numerals		VIII		XII		XIX

4. Write the numbers using Roman numerals.

(1) 9 ☐	(2) 2 ☐	(3) 17 ☐
(4) 4 ☐	(5) 11 ☐	(6) 18 ☐

5. In the table below, each given number is written in international numerals and then again in Roman numerals. If it is written correctly in Roman numerals, put '✓' in the box under it. If not, put '✗' and correct it.

International numerals	4	6	8	16	15
Roman numerals	IIII	VI	IIX	XVI	VVV
Right / Wrong (If wrong, correct the numeral.)					

Something more : L, C, D and M are also used as Roman numerals.

Roman numerals	I	V	X	L	C	D	M
Numbers	1	5	10	50	100	500	1000

Activity : Apart from clocks and watches, where else do we see Roman numerals?

The decimal system of writing numbers

It is not easy to read or write numbers using Roman numerals. It also makes calculations difficult. You have learnt to write numbers using the ten digits, 0 to 9. In that system, the value of a digit depends upon its place in the number. This system of writing numbers is called the 'decimal system'.

Mathematicians of ancient India invented the decimal system of writing numbers and began to use it. Later, this system was accepted in all parts of the world because it was simple and convenient.

टेस्ट सोडवा

- Sing with actions. (हावभावासहित म्हणा.)

Songs and Greetings

Revision

- Listen, learn and sing with actions.
ऐका, शिका आणि ही गाणी हावभावांसह म्हणा.

01

Unit One : Revision



Song 1

Good morning, good morning,
The best to you this morning!
How are you? How are you?
I hope you are feeling fine
And happy all the time!

Song 2

The more we get together,
Together, together,
The more we get together,
The happier we'll be.

For your friends are my friends
And my friends are your friends.
The more we get together,
The happier we'll be.

sing dance play sway

ही गाणी चालीवर म्हणण्याचा सराव घ्यावा. चालीसाठी पहा : freekidsmusic.com/traditional-childrens-songs/.
या पानावरील चित्रांत दर्शवल्याप्रमाणे संवादांचा सराव करण्यासाठी वर्गातील मुलांना मोठ्या गटात एकत्र करावे. गटात प्रत्येकाने फिरून जास्तीत जास्त मुलांशी (इंग्रजीतून) बोलण्याचा प्रयत्न करावा.

06

१. आपली पृथ्वी–आपली सूर्यमाला

वाचा व समजून घ्या.

टेस्ट सोडवा

सूर्यमालेतील प्रत्येक ग्रह सूर्याभोवती ठरावीक मार्गावरून परिभ्रमण करतो. त्या मार्गाला त्या त्या ग्रहाची कक्षा म्हणतात. सूर्य हा तारा आणि सूर्याभोवती फिरणाऱ्या ग्रहांना एकत्रितपणे सूर्यमाला म्हणतात. सूर्यमालेत ग्रहांबरोबर इतरही काही खगोलीय वस्तूंचा समावेश होतो.

सूर्यमालेतील इतर खगोलीय वस्तू

उपग्रह : काही खगोलीय वस्तू ग्रहांभोवती परिभ्रमण करतात, त्यांना उपग्रह म्हणतात. उपग्रहांनाही सूर्यापासूनच प्रकाश मिळतो. रात्री आकाशात आपल्याला चंद्र दिसतो. तो स्वतःभोवती फिरता फिरता पृथ्वीभोवतीही फिरतो, म्हणून त्याला पृथ्वीचा उपग्रह म्हणतात.

सूर्यमालेत बहुतेक ग्रहांना उपग्रह आहेत. ग्रह आपापल्या उपग्रहांसह सूर्याभोवती परिभ्रमण करतात.

पौर्णिमेच्या दिवशी दिसणारे चंद्राचे स्वरूप

बटुग्रह : सूर्याभोवती प्रदक्षिणा घालणाऱ्या काही लहान आकाराच्या खगोलीय वस्तू आहेत. त्यांना बटुग्रह म्हणतात. यामध्ये प्रामुख्याने प्लुटो सारख्या खगोलीय वस्तूचा समावेश होतो. बटुग्रह सूर्याभोवती स्वतंत्रपणे परिभ्रमण करतात. बटुग्रहांना स्वतःची कक्षा असते.

लघुग्रह : मंगळ व गुरू या ग्रहांच्या दरम्यान असंख्य लहान लहान खगोलीय वस्तूंचा एक पट्टा आहे. या पट्ट्यातील खगोलीय वस्तूंना लघुग्रह म्हणतात. लघुग्रह देखील सूर्याभोवती स्वतंत्रपणे परिभ्रमण करतात.

सूर्याच्या तुलनेत सूर्यमालेतील इतर खगोलीय वस्तू आकाराने खूपच लहान आहेत. चंद्र पृथ्वीच्या सगळ्यांत जवळ आहे, म्हणून तो सूर्यापेक्षा आकाराने खूप लहान असूनसुद्धा आपल्याला मोठा दिसतो.

खाली आपल्या सूर्यमालेची आकृती दिली आहे. त्यात मध्यभागी सूर्य आणि त्याभोवती परिभ्रमण करणाऱ्या खगोलीय वस्तू व त्यांच्या कक्षा दाखवल्या आहेत. सूर्यमालेत ग्रह, उपग्रह, लघुग्रह, बटुग्रह यांचा समावेश होतो.



सूर्यमालेची आकृती – सूर्यमालेच्या आकृतीत केवळ पृथ्वीचा उपग्रह दाखवला आहे. याची नोंद घ्या.

पाठ वाचा व समजून घ्या.

टेस्ट सोडवा

१. इतिहास म्हणजे काय ?

१.१ इतिहास : भूतकाळातील घटनांचे ज्ञान करून देणारे शास्त्र

१.२ इतिहासाची शास्त्रीय पद्धत

१.३ इतिहास आणि आपण

१.४ भूतकाळ आणि भविष्यकाळ

१.१ इतिहास : भूतकाळातील घटनांचे ज्ञान करून देणारे शास्त्र

गेल्या वर्षी चौथ्या इयत्तेत आपण छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र आणि त्यांचे स्वराज्यस्थापनेचे कार्य यांचा अभ्यास केला. शिवाजी महाराजांच्या जन्मापूर्वीचा काळ म्हणजे आजपासून सुमारे चारशे वर्षांपूर्वीचा काळ. यालाच आपण चारशे वर्षे 'जुना' किंवा चारशे वर्षांपूर्वी 'होऊन गेलेला' काळ असेही म्हणू शकतो.

आपण व्यवहाराच्या सोयीसाठी काळाचे वेगवेगळ्या पद्धतीने भाग पाडत असतो. आत्ता, थोड्या वेळापूर्वी, थोड्या वेळानंतर; किंवा आज, काल, उद्या; किंवा या वर्षी, पुढील वर्षी इत्यादी शब्दप्रयोग करताना आपल्या नकळत आपण मनातल्या मनात काळ मोजत असतो. यामध्ये 'आत्ता', 'आज', 'या वर्षी' इत्यादी शब्दांनी लक्षात येणारा काळ म्हणजे वर्तमानकाळ. 'थोड्या वेळापूर्वी', 'काल', 'गेल्या वर्षी' इत्यादी शब्द भूतकाळ दर्शवतात. 'थोड्या वेळानंतर', 'उद्या', 'पुढील वर्षी' इत्यादी शब्दांनी भविष्यकाळ समजतो. निघून गेलेला क्षण हा भूतकाळ असतो. आत्ताचा चालू क्षण हा वर्तमानकाळ असतो. भविष्यकाळ हा अजून यायचा असतो.

भूतकाळात अनेक घटना घडून गेलेल्या असतात. उदाहरणार्थ, आज आपले वय दहा वर्षे असेल, तर आपल्या जन्माची घटना भूतकाळात दहा वर्षांपूर्वी घडली, असा त्याचा अर्थ होईल. त्याचप्रमाणे दहा वर्षांनी म्हणजे

भूतकाळ
जन्मदिवस
दहा वर्षांपूर्वी

वर्तमानकाळ
आम्ही दहा वर्षांचे आहोत.
आज

भविष्यकाळ
आम्ही वीस वर्षांचे होऊ.
दहा वर्षांनी

भविष्यकाळात आपले वय वीस वर्षे असेल. आपल्या जन्मदिवसापासून आजपर्यंतचा म्हणजे निघून गेलेला काळ हा आपला, म्हणजे एका व्यक्तीच्या आयुष्यातील, भूतकाळ होय.

भूतकाळात घडलेल्या घटना समजून घेण्याच्या शास्त्राला 'इतिहास' म्हणतात.

१.२ इतिहासाची शास्त्रीय पद्धत

इयत्ता तिसरी व चौथीमध्ये परिसर अभ्यास या विषयाच्या पाठ्यपुस्तकात आपल्याला वेगवेगळ्या शास्त्रांची ओळख झालेली आहे. कोणताही पुरावा प्रत्यक्ष प्रयोगांच्या कसोट्यांवर पुन्हापुन्हा तपासून पाहता येणे, हे या सर्व शास्त्रांचे वैशिष्ट्य असते. प्रत्येक पुरावा वेगवेगळ्या कसोट्यांवर तपासून तो विश्वास ठेवण्याजोगा आहे की नाही हे ठरवण्याच्या पद्धतीला शास्त्रीय पद्धत असे म्हणतात.

आपल्या जन्मापासूनच्या अनेक गोष्टी आपल्याला माहीत नसतात. असे असले, तरी आजीआजोबा, आईवडील इत्यादी माणसे आपल्या लहानपणच्या गमतीच्या गोष्टी सांगत असतात. त्या गोष्टी त्यांच्या आठवणीत असतात. एकाच गोष्टीची आठवण वेगवेगळ्या व्यक्ती सांगतात, तेव्हा त्यांच्या सांगण्यात थोडाफार फरक असू शकतो. अशा वेळेस नेमके बरोबर कोणते असा प्रश्न आपल्याला पडतो. नेमके बरोबर कोणते हे ठरवण्यासाठी, सांगितल्या गेलेल्या गोष्टींची बारकाईने तपासणी करावी लागते.

भूतकाळातील घटना पुन्हा जशाच्या तशा घडवून आणण्याचा प्रयोग करणे शक्य नसते. त्यामुळे इतिहास मांडण्याची पद्धत इतर शास्त्रांपेक्षा वेगळी आहे. असे असले, तरी त्यातील पुरावा शोधण्यासाठी, तपासण्यासाठी आणि जुळवण्यासाठी शास्त्रीय पद्धतीचाच उपयोग केला जातो. त्यासाठी आवश्यकता असेल तर इतर शास्त्रांची मदत घेतली जाते. हे सर्व विचारात घेऊन इतिहास हे एक शास्त्र आहे असे म्हटले जाते. इतिहास केवळ कल्पनेच्या आधारे लिहिला जात नाही.

भांडी

नाणी

ताम्रपट

ग्रंथ व हस्तलिखिते

इतिहासाची साधने

टेस्ट सोडवा

● पहचानो और बताओ :

रियाज

✻ आओ खेलें



स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

पहिली	दुसरी	तिसरी	चौथी	पाचवी	सहावी	सातवी
क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा

माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरून

पाचवी मराठी	पाचवी गणित	सेमी गणित	पाचवी इंग्रजी	पाचवी प.अ-1	पाचवी प.अ-2	हिंदी
क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक

दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

पहिली	दुसरी	तिसरी	चौथी	पाचवी	सहावी	सातवी
क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा

इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

पहिली	दुसरी	तिसरी	चौथी	पाचवी	सहावी	सातवी
क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा

निर्मिती - श्री.प्रविण डाकरे, श्री.जयदिप डाकरे वेब स्त्रोत-'ई-बालभारती' सौजन्य- जिल्हा परिषद कोल्हापूर

https://www.gurumauli.in